ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# प्राचीन भारताच्या इतिहासात पश्चिम विदर्भाची भूमिका

डॉ.अमोल बोरकर
(इतिहास विभाग प्रमुख ) आप्पास्वामी महाविद्यालय शेंदूरजना (अ.) जि.वाशिम

***प्रस्तावना :***



विदर्भाची विभागणी पूर्व विदर्भ व पश्चिम विदर्भ अशी करण्यात आली आहे. पूर्व विदर्भात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयाचा समावेश होतो. तर पश्चिम विदर्भामध्ये अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम जिल्हयांचा समावेश होतो. पश्चिम विदर्भालाच व-हाड म्हणतात. इंग्रज राजवटीत व-हाडला बेरार व हिंदी मध्ये बरार असे म्हटल्या जात असे. पश्चिम विदर्भाचे क्षेत्रफळ ५३८४ चौ.कि.मी. असून हे क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या १४.७५ टक्के आहे.

इंग्रजांच्या शासनकाळात भारताच्या इतिहास व संस्कृतीचे संशोधन सुरू झाले. या संशोधनाचा परिणाम महाराष्ट्र पुरातत्वीय संशोधनाची सुरूवात होय. इ.स.१८८५ मध्ये घ्वायनेङ या भूगर्भ शास्त्रज्ञाने गोदावरी काठी पैठण जवळील मुंगी या गावात घछिलकाङ या हत्याराचा शोध लावल्यापासून महाराष्ट्र - विदर्भात पुरातत्वीय संशोधनाला व उत्खननाला सुरूवात झाली.

**१) महाकाव्य काळ :**

पश्चिम विदर्भातील प्रदेश प्रभुरामचंद्राच्या चरणस्पर्शाने पवित्र झाले आहे. याच्या खुणा अमरावती जिल्हयातील सालबर्डी येथे दिसून येतात. सालबर्डी येथे वाल्मिकीचा आश्रम होता.[१] सिता अज्ञातवासात असतांना येथेच वाल्मिकीच्या आश्रमात ती राहत होती. येथेच सितेनी लव व कुशांना जन्म दिला. लव-कुशांची हिच ती क्रिडाभूमी होती. लव व कुशांनी रामाचा अश्व अडवला होता.[२] सितेची न्हाणी म्हणून येथेच सर्व परिचित असलेल्या गरम-थंड पाण्याचे कुंडातच सीता स्नात करीत होती. या याच कुंडात (तळयात) स्नान केल्याने त्वचेचे रोग बरे होतात.[३] असा समज आजही लोक-मानसात रूजला आहे.

महाभारतातील विदर्भात रूक्मी राजाचे राज्य असून कौंडीण्यपूर हे राजधानीचे ठिकाण होते.[४] श्रीकृष्ण रूक्मिणी हरणाची कथा अमरावतीच्या अंबादेवीच्या मंदिराशी संबंधित आहे. रूक्मिणी स्वयंवरातील अंबिकापूर म्हणजे अमरावती होय.[५] रूक्मिणीचे हरण श्रीकृष्णाने केले. श्रीकृष्णाचा पराभव केला तरच कौंडिण्यपूरास येईल अशी प्रतिज्ञा रूक्मीने केली. श्रीकृष्ण व रूक्मिणी यांच्या संघर्षात रूक्मीचा पराभव झाल्याने तो प्रतिज्ञेप्रमाणे कौंडिण्यपूरास न जाता त्याने कुंडीनपूराच्या अलिकडे 'भोजकट' नावाचे शहर वसविले. पुढे हिच विदर्भाची राजधानी झाली.[६] 'भोजकट' म्हणजे अमरावती शहराजवळील भातुकली होय.

रामायण, महाभारत काळात विदर्भात अनार्याची सुसंस्कृत-संस्कृती व शासन अवस्था अस्तित्वात होत्या. आर्यांनी या भागात वसाहती स्थापन करीत असतांना कधी बळाचा वापर केला तर कधी वैवाहिक संबंध प्रस्तावित केले. काळाच्या ओघात आर्य-अनार्य संस्कृतीचे बेमालूम मिश्रण झाले. नुतन संस्कृती निर्माण झाली. नवीन निर्माण झालेली संस्कृती आर्य विचाराने प्रभावित झालेली आढळते.

**०२) मौर्यकाळ :**

मौर्यसत्तेच्या स्थापनेपासून भारताचा सुसंगत इतिहास मिळतो. विशाल भारतावर एकछत्री राज्य करणारे घराणे म्हणून मौर्य घराणे ओळखले जाते. हया घराण्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य होय. चंद्रगुप्त मौर्याचा साम्राज्य विस्तार दक्षिण भारतात कुठपर्यंत होता या विषयी मतभेद असले तरी, साहित्यीक व पुरातत्वीय साधनांच्या आधारे विदर्भाचा समावेश त्यांच्या राज्यात होता असे दिसून येते. मौर्यांच्या काळात बौध्द धर्माचा प्रसार पश्चिम विदर्भात झाला. अकोला जिल्हयातील पातूर येथील बौध्दलेणी व स्तुप याची साक्ष देतात.[७]

दक्षिण भारतात मौर्यांचे वर्चस्व होते. त्या काळात पश्चिम विदर्भात मौर्य साम्राज्याचा महत्वाचा भाग होता. पश्चिम विदर्भात शांतता, सुव्यवस्था ठेवण्यासाठी, अंमलबजावणी करण्यासाठी अशोकाने अधिका-यांना सूचना दिल्या होत्या.

### ०३) सातवाहन राजवंश :

सातवाहनांचा कालखंड इ.स.पूर्व २३० ते इ.स.२३० मानला जातो. व-हाडचा (पश्चिम विदर्भ ) स्वातंत्र्य इतिहास आंध्र अथवा सातवाहन राज्याच्या इतिहासाबरोबर सुरू होतो. त्यांच्या राज्यात व-हाड राज्याचा समावेश होता. इ.स.पूर्व तिस-या शतकात आंध्र लोकांनी गोदावरी व कृष्णा नदीच्या काठचा प्रदेश आपला होता. अशोकाच्या मृत्युनंतर हे लोक जास्त प्रबल झाले व त्यांनी व-हाडपर्यंतचा प्रदेश हस्तगत केला.[८] सातवाहनाचे शिलालेख व नाणी महाराष्ट्रात मोठया प्रमाणात मिळाले. पश्चिम विदर्भामध्ये कौंडिण्यपूर उत्खननात एक तांब्याचे नाणे मिळाले. त्याच पुढच्या भागावर पुरूषाच्या उजव्या हातात दंड आणि डाव्या हातात कमंडलु आहे. याच्या खाली एक षडरचक्र, उजव्या बाजूला सवेदिकवृक्ष व डाव्या बाजूला काही अस्पष्ट चिन्ह आहे. या नाण्याच्या मागच्या बाजूला पशूची अस्पष्ट आकृती आणि समत्स्यनदी कोरली आहे. हे नाणे सातवाहन राजे सातीश्री किंवा श्रीसातचे मानले जाते.[९] अकोला जिल्हयात मंगरूळपीर तालुक्यात 'त-हाळा' येथे उत्तरकालीन सातवाहन राजांच्या मिळालेल्या नाणे संग्रहावरून या प्रदेशातील प्रस्थापित सातवाहन राजाबद्दल पुरेसा प्रकाश पडतो. [१०] या नाण्यावरून श्रीकुंभ सातकर्णी, श्रीशक सातकर्णी, श्रीकर्ण सातकर्णी या तीन पैकी दोन राजे त-हाळा येथे मिळालेल्या नाण्यावरून समजतात.[११]

सातवाहनाच्या कालखंडातच काही काळ विदर्भावर कुशान महाक्षत्रपांची सत्ता होती. पश्चिम विदर्भामध्ये अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, याठिकाणी पश्चिम क्षत्रपाची नाणी मिळाली आहे.[१२] यावरून हे दिसून येते की, ही नाणी विदर्भात चलनाचे माध्यम म्हणून प्रचलित असावी.

### ०४) वाकाटक राजवंश :

सातवाहन घराण्यानंतर वाकाटकांनी पश्चिम विदर्भावर राज्य केले. एलिचपूरच्या (अचलपूर) दक्षिणेत सात मैलावर चम्मक नावाचे गाव आहे. येथे प्रवरसेनचा ताम्रपट सापडला. प्रवरसेनाने भोजकट प्रांतातील मधू नदीच्या (चंद्रभागा) चर्माक नावाचे गावाखालील ८००० मापे जमिनीसह निरनिराळया गोत्रातील एक हजार ब्राम्हणांना दान दिल्याचा उल्लेख आहे.[१३] प्रभावती गुप्ताने एक ऋध्दपूर ताम्रपट व्दितीय प्रवरसेनच्या शासनकाळाच्या एकोणीसाव्या वर्षी रामगिरी स्वामीच्या पादुकांजवळ दिला होता. त्यात तिने काही ब्राम्हणांना दान दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. या लेखातील अश्वत्यनगर अचलपूर तालुक्यातील घ्असतपूरङ असावे.[१४]

व्दितीय विन्धशक्तीचा इ.स.१९३९ मध्ये सापडलेल्या वाशिम ताम्रपटावरून प्रथम प्रवरसेनच्या निधनानंतर वाकाटकांच्या चार शाखा झाल्या. त्यातील दोन शाखांची माहिती मिळते. त्यात प्रथम प्रवरसेनचा नातू व गौतमीपूत्राचा मुलगा प्रथम रूद्रसेन याने नंदीवर्धन शाखेची स्थापना केली तर प्रथम प्रवरसेनचा दुसरा मुलगा सर्वसेन वत्सगुल्म (वाशिम) शाखेची निर्मिती केली. जेष्ठ शाखेच्या अंमलाखाली उत्तर विदर्भ व वत्सगुल्म शाखेच्या अंमलाखाली गोदावरीच्या तिरापर्यंत पसरलेला दक्षिण विदर्भ होता असे दिसते. [१५] वत्सगुल्म शाखेतील सर्वसेन याने हरिविजय नावाचे काव्य लिहीले.[१६]

वाकाटकांच्या काळी पश्चिम विदर्भाची अत्यंत भरभराट झाली. या काळात पश्चिम विदर्भात संस्कृत व प्राकृत वाङ्‌मय, कलाकौशल्य, व्यापार इत्यादिंना उत्तेजन मिळून पश्चिम विदर्भाची किर्ती दूरपर्यंत पसरली. म्हणून या काळात पश्चिम विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचे सुवर्णयुग मानण्यास हरकत नाही.

### ०५) कलचुरी राजवंश :

वाकाटकांच्या अस्तानंतर इ.स.५५० च्या सुमारास माहिष्मतीच्या कलचुरीचे राज्य विदर्भात प्रस्थापित झाले. कलचुरी वंशाचा संस्थापक कृष्णराज यांची चांदीची नाणी अमरावती जिल्हयातील धामोरी या गावी सापडली आहेत. या नाण्यांच्या पुढील बाजूवर राजाचा मुखवटा असून मागील बाजूवर ' मातापितृपानुध्यातपरममहिश्वर श्री कृष्णराज ' असा तत्कालीन लिपीत लेख दिसतो.[१७]

### ०६) राष्ट्रकुट राजवंश :

दंतिदुर्ग राजाने इ.स. ७५० च्या सुमारास राष्ट्रकुट साम्राज्य स्थापन केले. यांचे घराणे इ.स.च्या पाचव्या सहाव्या शतकात कर्नाटकातील लाहून (लट्टलूर) या ठिकाणचे दंतिदुर्ग राजाचा एक पूर्वज दुर्गराज येथून व-हाड (पश्चिम विदर्भ) प्रांतामध्ये एलिचपूर (अचलपूर) तालुक्यात वास्तव्यास राहिला. त्यांचा पणतू नत्रराज युधासूर हा प्रथम आपल्या पराक्रमाने इ.स.६५० च्या सुमारास मांडलीकाचे पदवी धारण केली. [१८] त्यावेळी त्यांची राजधानी अचलपूर होती.[१९] राष्ट्रकुटांचा ताम्रपट अकोला जिल्हयात सांगळूद येथे मिळाला आहे.[२०] राष्ट्रकुटराजा पहिला कृष्ण यांचा लेख भांदक (भद्रावती) येथे मिळाला. या लेखावरून कृष्ण राजाने यवतमाळ

जिल्हयातील ‘उदबरमती’ म्हणजे आताचे अमरावती येथील सुर्यमंदिरास नारायणगाव याने दान दिल्याची माहिती मिळते.[२१] गोविंदराज तिसरा याचे ताम्रपट अकोला आणि अमरावती जिल्हयात सापडले आहेत. त्यामध्ये विव्दान ब्राम्हणांना अनेक गाव दान दिल्याचा निर्देश आहे.[२२] राष्ट्रकुटांनी कला, स्थापत्य, साहित्याला योगदान दिले. गडचिरोली जिल्हयातील मार्कन्डेय देवालये याच काळातील होते.

### ०७) देवगिरीचे यादव राजवंश :

देवगिरीचे यादव घराणे विदर्भाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. इ.स.१०८७ मध्ये यादव वंशातील भिल्लदेव याने देवगिरी येथे यादव घराण्याची सत्ता स्थापन केली. या राज्याचा विस्तार पश्चिम विदर्भापर्यंत होता. यादवाचे अनेक लेख पश्चिम विदर्भात सापडतात. सिंहण गादीवर आल्यानंतर व-हाड (पश्चिम विदर्भ) जिंकून आपल्या राज्याला जोडला. बुलढाणा जिल्हयातील अमडापूर येथे एक शिलालेख सापडला आहे.[२३] राजा कृष्णाच्या काळचा शके ११७७ (१२५४-५५) चा मराठी लेख पश्चिम विदर्भातील नांदगाव (खंडेश्वर) येथील टेकडीवर खंडेश्वर, देवी व नरसिंह या तीन देवतांचे मिळून एक समान सभामंडप असलेले देवालय आहे. त्याच्या बाहेरील भिंतीवर कोरला आहे.[२४] हे देऊळ हेमापडपंथी आहे.

### निष्कर्ष :

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये पश्चिम विदर्भाचे अनन्य साधारण महत्व आहे. मौर्य सातवाहन, वाकाटक , कलपुरी, राष्ट्रकुट, यादव इत्यादी वंशाच्या काळात पश्चिम विदर्भात स्थापत्य, साहित्य क्षेत्रात प्रगती झाली.

### संदर्भ सूची :-


१. काळे, या.मा.व-हाडचा इतिहास (सन १८०३ ते १९०२ )१९२४ पृ.५३
२. जोशी, लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड १ , पृ.३६३
३. किला, पृ. ३६३
४. केतकर, श्रीधर व्यंकटेश, ज्ञानकोश, १९२३, पृ.११२
५. काळे, या.मा.पूर्वोक्त, पृ. ५२-५३
६. किला, पृ.५२-५३
७. कोलते वि.भि. प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर पृ.३
८. केतकर , श्री व्यं., महाराष्ट्रातील ज्ञानकोष , वि. १९, पृ.११२
९. डॉ.गुप्त, चंद्रशेखर, प्राचीन विदर्भाचा ऐतिहासिक भूगोल, २००४ , पृ.९
१०. किला, पृ ३३
११. किला, पृ ३४
१२. किला पृ ३२
१३. काळे, या.मा. पूर्वोक्त, पृ. ६४
१४. मिराशी, वा. शी. , मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक, पृ. १०५ , १०७
१५. मिराशी, वा. वी. , वाकाटक नृपती आणि त्याचा काळ , पृ. ७
१६. कोलते, वि.भि., प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर, पृ.६
१७. मिराशी, वा. वी., पूर्वोक्त , पृ. १४४
१८. कोठे, प्रशांत, अचलपूरचा इतिहास इ. स. १७६४ - १८५३, २०१३, पृ. १४
१९. अलतेकर, अ.स. , राष्ट्रकुट साम्राज्याचा इतिहास, पृ. ७
२०. मिरशी, वा.वि. , संशोधन मुक्तावली सर तिसरा, पृ ७०
२१. चौधरी, कि. का. संपा महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर परभणी जिल्हा, १९८८, पृ. ३७
२२. काळे, या. मा. , वऱ्हाडाचा इतिहास सन १८०३ ते १९०२ , १९२४, पृ. ७३
२३. मिराशी, वा. वि., पूर्वोक्त, पृ. ७१.